जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 OCT 2019
Times of India

# SUK's Food Science & Technology department signs MoU with CSIBER

The Department of Food Science and Technology of the Shivaji University, Kolhapur (SUK), recently signed a memorandum of understanding (MoU) with the Chhatrapati Shahu Institute of Business Education and Research (CSIBER).

**CAMPUS BUZZ**

It has been signed for the next five years.

Under the MoU, both the institutes will work on organising national conferences, certificate courses (water quality standards for food processing industries), training program (food safety management system), and food technology and nutrition.

D T Shirke, pro-VC, SUK, said, "The MoU will help in empowering women, as both the institutes have substantial number of women. The students as well as the institutes will benefit out of it."

TOI



The students as well as the institutes will benefit from it, said D T Shirke, pro-VC, SUK

### Lead India program at KIT

The city-based Kolhapur Institute of Technology's College of Engineering, under its Lead India initiative had organised an interaction with the deputy superintendent of police for Karveer, Prashant Amrutkar.

The topic of interaction was 'today's youth and social responsibility'. Amrutkar interacted with the students.

He said, "Everyone has to go go through disappointments in their life at one stage or another. How we keep ourselves such situations and turn it into an opportunity, defines us. I have experienced this in my life and it has taught me many things." He advised the students to use social media responsibly.

### Elocution competition at New College

City-based New College had organised the third edition of the state-level Marathi elocution competition recently. In the competition Aurangabad's Harshad Auoti from Matoshri Kanchanlal Desarda College won the first prize.

### Get-together at MBA department

A get-together was organised recently for the alumni of the management department of the Shivaji University. The department started functioning from 2004.

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विधी विभागातील विद्यार्थ्यांनी कळंबा कारागृहास भेट दिली.

# विद्यापीठाच्या विधी विभागातील विद्यार्थ्यांची कळंबा कारागृहास भेट

**संभाजीनगर : वार्ताहर**

शिवाजी विद्यापीठाच्या विधी विभागातील विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमांतर्गत मध्यवर्ती कळंबा कारागृहास भेट दिली. यावेळी कारागृह अधीक्षक शेळके यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांना मार्गदर्शन केले.

कारागृहातील सोयी सुविधा नियोजन, रुग्णालय, भोजन गृह, बेकरी, लाडू विभाग, ग्रंथालय रेडिओ स्टेशन, कारखाना, शेती याबाबतची माहिती वरिष्ठ तुरुंग अधिकारी जाधवर, पोलिस उपनिरीक्षक बनकर यांनी दिली. विधी विभागप्रमुख धुपदाळे यांनी प्रास्ताविक केले. चेतन घाटगे यांनी आभार मानले. यावेळी कारागृह अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. डॉ. चंद्रानी बागडी, वैभव कांबळे, प्रमोद भोसले, आसिफ मुल्ला, संदीप चाटे, जयवंत खाडे, ज्ञानेश्वरी मोहिते, अनिता लोहिया यांच्यासह विद्यार्थी सहभागी होते.

पुढारी

# मोबाईलच्या मर्यादित वापराने अनेक गोष्टी होतील सुकर

## डॉ. विलास नांदवडेकर : वक्तृत्व स्पर्धा बक्षीस वितरण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आधुनिक काळातील युवापिढी मोबाईलच्या आहारी गेली आहे. मोबाईल व त्यातील विविध सुविधांचा योग्य व मर्यादित वापर केल्यास अनेक गोष्टी सुकर होतील, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले.

श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संचलित न्यू कॉलेज व ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डी. बी. पाटील व्याख्यानमाला व सांस्कृतिक कार्यक्रम समिती यांच्या संयुक्त विदयमाने वकृत्व स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष आर.डी. पाटील होते. वक्तृत्व स्पर्धेत औरंगाबाद येथील मातोश्री कांचनलाल देसरडा महाविदयालयाचा हर्षद औटीने प्रथम क्रमांक मिळविला. पुण्याच्या मॉडर्न कॉलेज येथील तेजस पाटील याने व्दितीय तर विवेकानंद कॉलेज, कोल्हापूरच्या प्रणाली मगदूमने तृतीय क्रमांक पटकाविला. कागलच्या डी. आर. माने महाविदयालयाच्या शर्मिला पाटील व कमला महाविदयालयाच्या ऋतुजा पाटील यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. उमा गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. स्पर्धा समन्वयक डॉ. कविता गगराणी यांनी आभार मानले.

# वक्तृत्व स्पर्धेत हर्षद औटी प्रथम

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे न्यू कॉलेज आणि ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डी. बी. पाटील व्याख्यानमाला व सांस्कृतिक कार्यक्रम समिती यांच्या संयुक्त विद्यमाने तिसऱ्या राज्यस्तरीय महाविद्यालयीन मराठी वक्तृत्व स्पर्धा झाल्या. यामध्ये औरंगाबाद येथील मातोश्री कांचनलाला देसरडा महाविद्यालयाचा हर्षद औटी याने प्रथम क्रमांक मिळविला. वक्तृत्व स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर हे उपस्थित होते.

या स्पर्धेत पुण्याच्या मॉडर्न कॉलेज येथील तेजस पाटील यांनी द्वितीय, तर विवेकानंद कॉलेज, प्रणाली मगदूम हिने



**स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस देताना मान्यवर.**

तृतीय क्रमांक मिळवला. कागलच्या डी. आर. माने महाविद्यालयाच्या मनिषा पाटील व कमला महाविद्यालयाच्या ऋतुजा पाटील या विद्यार्थिनीस उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

बक्षीस वितरण सोहळ्यात प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. संस्थेचे संचालक विनय पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. अध्यक्षस्थानी संस्थेचे व्हा. चेअरमन आर. डी. पाटील होते. डॉ. कविता गगराणी यांनी आभार मानले. अविनाश पाटील यांनी संचालकांचे स्वागत केले. डॉ. अलोक जत्राटकर यांनी निकाल जाहीर केला. डॉ. सर्जेराव शेटके, उमा गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 OCT 2019
तरूण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्यासोबत प्रोफेसर स्टुअर्ट गॉर्डन, डॉ. सारा दुआल, डॉ. अवनिश पाटील, डॉ. नमिता खोत.

# डॉ. स्टुअर्ट गॉर्डन इतिहास विभागात रूजू

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागामध्ये नव्याने सुरू झालेल्या रिसर्च प्रोफेसर योजनेअंतर्गत अमेरिकेतील मिशिगन विद्यापीठातील प्रोफेसरपदी स्टुअर्ट गॉर्डन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ते मे २०२० पर्यंत कार्यरत राहतील. त्यांच्यासोबत त्यांच्या पत्नी डॉ. सारा दुआल यादेखील फुलब्राईट स्कॉलर म्हणून विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागात रूजू झाल्या आहेत. या दोघांनी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची भेट घेतली. याप्रसंगी कुलगुरूंनी दोघांचे स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

डॉ. स्टुअर्ट गॉर्डन यांचा "द मराठाज" हा अत्यंत गाजलेला ग्रंथ असून त्यामध्ये मराठे मूळचे कोण होते, त्यांनी प्रतिष्ठा कशी मिळवली, मराठ्यांनी महसूल व्यवस्था कशी विकसित केली आदी महत्वाच्या बाबींचा उहापोह केलेला आहे. डॉ. स्टुअर्ट गॉर्डन यांनी युनिव्हर्सिटी ऑफ मिशिगनमधून सन १९७२ मध्ये पीएच. डी मिळवली. त्यांनी सामाजिक बंधने आणि दरोडेखोरी, किल्ल्यांचे इतिहासातील योगदान, वारसाहक्क आणि राजपद, प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढण्याची इतिहासातील उदाहरणे आणि युरोपीय पध्दतीच्या लष्कराचे झालेले अनुकरण अशा वैविध्यपूर्ण विषयांवर लेखन केलेले आहे.